# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

# "१९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातील भटक्या - विमुक्तांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवानाचा अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विद्याशाखांतर्गत
मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर
करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा अंतिम आराखडा


संशोधिका

**ज्योती पांडुरंग सोनसळे**
एम. ए. (मराठी), एम. एड., एम.फिल.
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मार्गदर्शक

**पाचार्य डॉ. नागनाथ पाटील**
श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय,
वसमतनगर जि. हिंगोली.


**ऑगस्ट - २०१७**

## "१९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातील भटक्या - विमुक्तांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवानाचा अभ्यास"

**प्रस्तावना :-**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजाचा देशाकडे आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अत्यंत आशावादी बनला. दरम्यानच्या काळात म्हणजेच देश स्वातंत्र्यानंतर जनहिताच्या दिशेने वारे वाहु लागले. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार वेगवान झाला. शिक्षण हे अगदी तळागाळातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचले. शोषित, पीडीत, दलितांना शिक्षणाचा लाभ आणि आस्वाद घेता येऊ लागला. शोषित, पीडीतांना, दलितांना आपल्या हक्काची, अस्मितेची जाणीव व्हायला सुरूवात झाली आणि त्यासाठी धडपडीच्या स्वरूपात चळवळी निर्माण होऊ लागल्या.

१९५० साली स्वतंत्र भारताची घटना आमलांत आली आणि सक्तीच्या शिक्षणाच्या तरतुदीमुळे भटक्या-विमुक्त दलितांपर्यंत शिक्षण पोहोचले. खऱ्या अर्थाने स्वतःच्या अस्तित्वाची व माणूसपणाची जाणीव त्यांना झाली. १४ ऑक्टोबर १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ कोटी जनतेसह धर्मांतर केले. तळागाळातील सर्व भटक्या-विमुक्त दीन-दलित यांना माणूस म्हणून जगण्याचा, शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला. त्यांना समाजात वावरतांना जातिभेद विरहीत समानतेचा दर्जा मिळवून दिला. अशा समाज परिवर्तनीय कार्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख उपेक्षित समाजाला होऊ लागली. भटका - विमुक्त दीन - दलित समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपले आदर्श, प्रेरणास्थान, श्रद्धास्थान मानु लागला.

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणात वेगळेपण दिसून आले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, विज्ञानवादी साहित्य, या आधि अशा विविध वाङ्मयीन प्रवाहांनी मराठी साहित्यातील जुनी जळमटे, लेखनातील तोच तो साचलेपणा दूर केला. आता मराठी साहित्य विविध प्रवाहांनी अधिक वास्तववादी बनले. या

विविध वाङ्मयीन प्रवाहांनी मराठी साहित्याला वास्तववादाचा रूपेरी साज चढवून अधिक खुलविले. एक प्रकारचे प्रखर तेज मराठी साहित्याला बहाल केले. प्रत्येकालाच अगदी दीन - दलितांनासुद्धा असे वाटू लागले की, "अरे ! ही तर माझीच चित्तरकथा. "

**विषयाचे महत्त्व :-**

भारतीय समाज संरचना ही स्तरीकरणाची आहे. ढोबळ मानाने उच्चस्तर, मध्यमस्तर आणि निम्नस्तर असे वर्गीकरण पाहण्यास मिळते. मुळात त्या स्तरीकरणाचा परिणाम म्हणजेच कुठेतरी असंख्य जाती - जमातींचया निर्मितीचे उगमस्थान आहे असे म्हणता येईल. त्यानंतर शहरी भागात वास्तव्य करणारा 'शहरी समाज', खेड्यात गावात वास्तव्य करणारा 'ग्रामीण अथवा खेडूत' समाज, डोंगर दऱ्या खोऱ्यात वास्तव्य करणारा 'आदिवासी समाज' आणि शहराच्या आजुबाजुला पाल मांडुन राहणारा, भटकंती करणारा 'भटका - विमुक्त समाज', गावकुसाबाहेर वस्ती करून राहणारा दीन - दुबळा 'दलित समाज' असे समाजाचे व ओघानेच माणूसपणाचे तुकडे पाडण्यात आले आणि काही तुकडे जाणिवपूर्वक इतके दूर फेकण्यात आले की, त्यांच्यावर कधीच कुणाचेच लक्ष गेले नाही अगदी शासनयंत्रणेनेसुद्धा भटक्या - विमुक्तांना गृहित धरले नाही. अशा उपेक्षित, दुर्लक्षित समाजाने स्वतःच्या दुःख, यातनांना वाट मोकळी करून दिली. स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या ओंगळ आणि विद्रुप जगण्याला त्यांनीच साहित्याचा विषय बनविले. आपले भेसूर जीवनानुभव शब्दरूपाने साहित्यात साकारले.

भटक्या - विमुक्तांचे जनजीवन हे गावाबाहेर दीन - दलितांच्या तुलनेत कशा प्रकारे भिन्न व भणंग स्वरूपाचे आहे हे इथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भटक्या-विमुक्तांच्या वेदना, शोषण, अज्ञान, आचार - विचार, जीवनशैली त्यांची संस्कृती, त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती, त्यांच्या प्रथा-परंपरा, देव - देवता, सण - उत्सव, न्यायनिवाडा, जातपंचातयत, पेहराव बोली अशा विविध अंगाने विचार करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :-**

"१९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातील भटक्या - विमुक्तांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवानाचा अभ्यास" या संशोधन विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.

१) १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातील भटक्या - विमुक्त घटकांच्या उदरनिर्वाह आणि जीवनशैलीचा शोध घेणे.

२) भटक्या - विमुक्तांचा सामाजिक दर्जा आणि सांस्कृतिक जपणूक यांचा अभ्यास करणे.

३) भटक्या - विमुक्तांच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक बाजूंचा विवेचनात्मक शोध घेणे.

४) भटक्या - विमुक्तांच्या दैनंदिन जीवनात रूढी, परंपरा, जातपंचायत, न्यायनिवाडा, स्त्रियांचा दर्जा आणि स्थान यांचा शोध घेणे.

५) भटक्या - विमुक्त घटकांचे शैक्षणिक जीवन आणि वर्तमानकालीन स्थिती - गतीचा शोध घेणे.

६) भटक्या - विमुक्तांच्या आत्मकथनातील निवेदनशैली, भाषिक सौंदर्य, नवनवीन शब्दांची शब्दसंग्रहात पडणारी भर, वाक्यप्रचार, म्हणी इत्यादींचा शोध घेणे.

७) भटक्या - विमुक्तांच्या आत्मकथनांमधून त्यांच्या दुःखाचा, वेदनेचा, त्यांच्यावर विविध समाज घटकांकडून आणि शासनयंत्रणेकडून होणाऱ्या अन्याय - अत्याचाराचा शोध घेणे.

**संशोधनातील गृहीतके :-**

कोणत्याही विषयावर संशोधन कार्य करत असतांना संशोधकास गृहीतके यांची मांडणी करावी लागते. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्याची गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत.

१) १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनात भटक्या - विमुक्तांच्या आत्मकथनांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे.

२) मराठी आत्मकथनात भटक्या - विमुक्तांची आत्मकथने आणि त्यातील सामाजिक व सांस्कृतिक स्थितीगती अधिक वास्तववादी आणि जाचक आहे.

३) मराठी आत्मकथनात इतर आत्मकथनांच्या तुलनेत भटक्या - विमुक्त घटकांची आत्मकथने निवेदन, भाषाशैली, घटना - प्रसंग, वातावरणनिर्मिती, व्यक्तिरेखा या सर्वच बाबतीत आपले वेगळेपण दर्शवितात.

४) मराठी भटक्या - विमुक्तांचया आत्मकथनांना कल्पनाविलास अथवा रंजकता स्पर्श करतांना दिसून येत नाही. ही आत्मकथने वास्तविकतेशी जवळीक साधणारी आहेत.

५) भटक्या - विमुक्तांची वर्तमानकालीन परिस्थिती आणि आधुनिक बदलत्या काळानुसार समानतेच्या तत्वांचा स्वीकार आणि आस धरून ती आत्मकथने पुढे आली आहेत.

**संशोधन विषयाची व्याप्ती व कालमर्यादा :-**

प्रस्तुत संशोधनात मराठी आत्मकथनातील भटक्या - विमुक्तांच्या आत्मकथनाचा १९९० पासून पुढील काळात निर्माण झालेल्या जवळपास आत्मकथनांचा आढावा घेण्यात येणार आहे. संशोधन विषयाची व्यापकता मोठी आहे आणि संशोधन कार्य निर्धारित वेळेत पूर्णत्वास न्यावे आणि संशोधन कार्यास योग्य न्याय देण्याचा प्रयत्न संशोधिका करणार आहे.

**संशोधन साहित्याचे संकलन :-**

"१९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातील भटक्या - विमुक्तांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवानाचा अभ्यास" या विषयी संशोधन सिद्धीस नेण्यासाठी विविध भटक्या - विमुक्त घटकांमधून आलेल्या आत्मकथनांचा अभ्यास स्त्रोत म्हणून आधार घेतला जाणार आहे. संबंधित विषयाला अधिक न्याय देण्याच्या दृष्टीने रसिक, वाचक व अभ्यासकांकडून विषयानुरूप माहिती संग्रहीत करण्यात येईल. संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, प्रकाशित - अप्रकाशित शोधप्रबंध, विशेषांक, वाङ्मयकोश, व्याख्याने, इंटरनेटवरील माहिती, विविध साहित्य संमेलनाच्या स्मरणिका अशा प्रकारच्या संशोधन कार्यास पूरक साहित्याचा वापर करण्यात येणार आहे.

**संशोधन पद्धती :-**

सदरील संशोधन विषयामध्ये संशोधिका वर्णनात्मक संशोधन पद्धती, साहित्यकृतींचे आशयविश्लेषण करून ऐतिहासिक संशोधन पद्धतीतील व्यक्तिचरित्र अभ्यास किंवा व्यष्टी अध्ययन पद्धतीचा वापर करणार आहे.

**प्रकरण पहिले**

**आत्मकथनांचे स्वरूप आणि भटक्यांची आत्मकथने**

प्रस्तुत प्रकरणत साठोत्तरी मराठी साहित्यात लोकप्रिय साहित्य प्रकार म्हणून मराठी आत्मकथनाने जी ओळख निर्माण केली आहे, त्या संदर्भात आत्मकथनांचे रचनात्मक स्वरूप, वैशिष्ट्ये आदींची चर्चा करून १९७० नंतर मराठी साहित्यात लिहिण्यात आलेल्या भटक्या - विमुक्तांच्या आत्मकथनांचा स्थूल अभ्यास करण्यात येणार आहे.

**प्रकरण दुसरे**

**भटके - विमुक्त जाती - जमातींचे स्वरूप**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्राच्या समाज जीवनात आपल्या भिन्न जीवनशैलीमुळे आपले व्यवच्छेदक स्थान कायम ठेवलेले भटके - विमुक्त (मुळ बेचाळीस) जाती - जमातींचा संकल्पनात्मक आणि स्वरूपात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

**प्रकरण तिसरे**

**१९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातील भटक्या - विमुक्तांचे सामाजिक जीवन**

प्रस्तुत प्रकरणात १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातून भटक्या - विमुक्तांचे जे सामाजिक जीवन प्रकट झाले आहे त्याचा आढावा घेण्यात येईल.

मुलतः मराठी साहित्यात आत्मकथन या साहित्यप्रकाराकडे एक सामाजिक व सांसकृतिक दस्ताऐवज म्हणून पाहण्यात येते. विविध भटक्या - विमुक्त जाती - जमातीतील लेखकांनी आपापल्या आत्मकथनातुन आपल्या स्वः जीवनाबरोबरच आपल्या जाती - जमातींचे जगणे हे मुखरीत केले आहे. या आत्मकथनातून भटक्या - विमुक्तांच्या जमातीय पारंपरिक,

सामाजिक जीवनाबरोबरच १९९० नंतरच्या जागतीकीकरणाच्या नव्या संक्रमणात त्यांच्या जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास विविध मुद्दांच्या आधारे स्पष्ट करण्यात येणार आहे.

## प्रकरण चौथे

## १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातील सांस्कृतिक जीवन

प्रस्तुत प्रकरणात १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातून भटक्या - विमुक्तांचे जे सांस्कृतिक जीवन प्रकट झाले आहे त्याचे विश्लेषण करण्यात येईल.

मुळात भारतीय संस्कृतित भटक्या - विमुक्तांची संस्कृती ही आपल्या पारंपरिक जगण्यामुळे वेगळी राहिली आहे. मध्यवर्ती संस्कृतीपासून लांब असलेली भटक्या - विमुक्तांची संस्कृती ही परीघाबाहेरची संस्कृती आहे. विविध आत्मकथनातुन रूढी, प्रथा, परंपरा, लग्नविधी, मृतिकाचा विधी, कंदोरी आणि जातपंचायत आदी महत्वपुर्ण सांस्कृतिक घटकातून भटक्या - विमुक्तांच्या प्राचीन संस्कृतीचे दर्शन आपणास घडते. त्याचेच सूक्ष्मपणे विवेचन प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

## प्रकरण पाचवे

## भटक्या - विमुक्तांचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे विशेष

प्रस्तुत प्रकरणात १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनातून भटक्या - विमुक्तांच्या ज्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रकटीकरण झालेले आहे ते मध्यवर्ती नागरी सामाजिक व सांस्कृतिक जीवनापासून कसे भिन्न आहे याचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

भटक्या - विमुक्तांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील विशेष १९९० नंतरच्या मराठी भटक्या - विमुक्तांच्या आत्मकथनात प्रकट झालेले आहे. त्याचा सूक्ष्म अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

**प्रकरण सहावे**

**उपसंहार**

**परिशिष्ट :-**

१) ना.धों. कदम - 'महाराष्ट्रातील भटका समाज : साहित्य आणि संस्कृती'

२) शंकरराव खरात - ' आज इथं, उद्या तिथ', 'भटक्या - विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न'

३) लक्ष्मण गायकवाड - ' हे स्वातंत्र्य कोणासाठी ?', 'साहित्य, समाज आणि स्वातंत्र्य'

४) शरणकुमार लिंबाळे - 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र'

५) मोतीराज राठोड - 'भटक्या - विमुक्तांचा जाहिरनामा'

**संदर्भग्रंथ सूची :-**

मार्गदर्शक
**पाचार्य डॉ. नागनाथ पाटील**
श्री. योगानंद स्वामी कला महाविद्यालय,
वसमतनगर जि. हिंगोली.

संशोधिका
**ज्योती पांडुरंग सोनसळे**
एम. ए. (मराठी), एम. एड., एम.फिल.
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड.